# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई CB 21/2026

# प्रेसनोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २७/०३/२०२६ |
|---|---|

**‘‘वेश्या व्यवसायातुन ०२ पिडीत महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका’’**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पृथ्वीराज घोरपडे यांना दिनांक २५/०३/२०२६ रोजी त्याचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ‘‘अश्वी, लॉजिंग अॅण्ड बोर्डिंग, प्लॉट नंबर ए/३३४, तुर्भे एमआयडीसी, तुर्भे येथील मॅनेजर/मालक हा लॉजमधील ग्राहकाकडुन ४५००/— रूपये घेवुन लॉजमधील रूममध्ये ठेवलेल्या महिला तसेच फोनमधील महिलाचे फोटो दाखवुन त्या पैकी एका महिला पसंद करण्यास सांगुन त्या महिल्यांकडुन वेश्या व्यवसाय करुन घेत आहे.’’

वपोनि/घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास हॉटेल अश्वी, लॉजिंग अॅण्ड बोर्डिंग, प्लॉट नंबर ए/३३४, तुर्भे एमआयडीसी तुर्भे येथे पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशाऱ्यावरून पथकाने लॉजवर छापा टाकला. त्याठिकाणी ०२ पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. लॉज मॅनेजर/मालक सुशिलकुमार नरेश शर्मा, वेटर उपेन्द्रकुमार घमाडी यादव, वेटर छोटनकुमार पेमन यादव यांनी पिडीत महिलांना प्राप्त करून त्यांना लॉजमध्ये ठेवुन वेटर उपेन्द्रकुमार घमाडी यादव याने त्यांना बनावट ग्राहकास दाखवुन बनावट ग्राहकाने पसंद केलेल्या महिलेस वेश्यागमनाकरीता पाठवल्याचा मोबादला म्हणुन ४०००/— रूपये बनावट ग्राहकाकडुन स्विकारले. आरोपी (१) सुशिलकुमार नरेश शर्मा, वय ३६ वर्षे व्यवसाय— मॅनेजर/मालक, सध्या रा. धाकटा खांदा, पनवेल, मुळ रा. ग्राम/पोस्ट सदबेहणी, उटारी रोड, जि.पलामु, राज्य झारखंड. (२) उपेन्द्रकुमार घमाडी यादव, वय २४ वर्षे, व्यवसाय— वेटर, सध्या रा. लॉजमध्ये, मुळ रा. बारीयातुल, पो. गामपुल, थाना गिधोर, जि.छत्रा, राज्य झारखंड. (३) छोटनकुमार पेमन यादव, वय २८ वर्षे, व्यवसाय— वेटर, सध्या रा. कोपरीगाव, वाशी मुळ रा. ग्राम बिंधानी, पो.पितजी, थाना राजपुर, जि.छत्रा, राज्य झारखंड यांनी आपसात संगणमत करून ०२ पिडित महिलांना वेश्या व्यवसायाकरीता प्राप्त करून नमुद लॉजचा वेश्या व्यवसायासाठी वापर केला. म्हणुन त्यांचे विरूध्द तुर्भे पोलीस ठाणे गु.रजि.नं. १८०/२०२६, भा.न्या.सं.कलम १४३ (३), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयातील ३ आरोपींना अटक केली असुन त्यांची दिनांक २८/०३/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे.

सदरची उल्लेखनिय कारवाई सहा. पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी/पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/२५०७ मनिषा पावडे, पोहवा/२५०४ सविता म्हात्रे, पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३४५२ कोलते, पोशि/३२३९ पारासुर व चालक पोहवा/हांडे यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★


पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
सहाय्यक पोलीस आयुक्त
व
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष
गुन्हे शाखा, नवी मुंबई